# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३ / श्रावण १३, १९४५ ( शके )**

**(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(२) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**
**(६) अन्न व औषध प्रशासन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १६**

---

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या बोगस पदव्यांव्दारे विद्यार्थ्यांनी परदेशात नोकरी मिळविल्याबाबत

**(१) * ७०४२० श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या बनावट पदव्या बनवून २७ जणांनी इराकमध्ये नोकरी मिळविल्याचे दिनांक २५ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) इराक दुतावासामार्फत २७ विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता तपासण्याकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाला पत्र प्राप्त झाले होते. त्यानुसार दि.१४ जून, २०२३ रोजी इराक दुतावासातील अधिका-यांनी विद्यापीठास प्रत्यक्ष भेट देऊन २७ विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्र तपासणीकरीता सादर केले होते. विद्यापीठात सदर विद्यार्थ्यांची नोंदणी नसल्याचे अभिलेख्याच्या तपासणी वरुन आढळून आल्याने विद्यापीठास सादर करण्यात आलेली प्रमाणपत्रे विद्यापीठाची नाहीत असे इराक दुतावासाला दिनांक १४ जून, २०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर विद्यार्थी हे इराकचे असल्याने त्यांची चौकशी इराक दुतावासामार्फत करण्यात येईल असे इराक दुतावासातील अधिका-यांनी विद्यापीठास कळविले आहे. सदर प्रकरणाची माहिती विद्यापीठाकडून अंबाझरी पोलीस स्टेशन, नागपूर तसेच सचिव, शिक्षा मंत्रालय, भारत शासन, नवी दिल्ली, सचिव, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारत शासन, नवी दिल्ली, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांना देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा ते कागल राष्ट्रीय महामार्गावरील किणी व तासवडे येथील टोल नाक्यांवर बेकायदेशीर टोल वसुली होत असल्याबाबत

**(२) * ६७५२१ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा ते कागल यादरम्यान राष्ट्रीय महामार्गावरील किणी व तासवडे येथील टोल नाक्यावर सुरू असलेली टोल वसुली बेकायदेशीर असल्याचे माहिती अधिकारात माहे मे, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किणी व तासवडे या नाक्यावरील टोल वसुली व प्रत्यक्षात प्रकल्पाच्या खर्चाची माहिती दिली असता ठेकेदाराकडून या प्रकल्पावर रुपये १५८७ कोटी खर्च करण्यात आले असून दिनांक २४ जून, २०२२ पर्यंत १९०६ कोटी ८१ लाख रुपयांचा टोल वसूल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नियमानुसार ४०% सवलतीच्या दरात टोल वसुली होणे आवश्यक असताना केवळ २५% सवलत दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निविदेंतर्गत प्रकल्प बांधणी पूर्ण होईपर्यंत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती रहदारीचे नियम प्रकल्प ठेकेदारावर निश्चित करुन प्रकल्प बांधणी पूर्ण झाल्यानंतर टोल वसुली करायची असल्याने या नाक्यावरील बेकायदेशीर टोल वसुली तातडीने रद्द करण्याची मागणी सांगली ट्रान्सपोर्ट असोसिएशनने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सातारा ते कागल या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे.

या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम सन २००६ मध्ये पुर्ण झाले. सवलत करारानुसार २० वर्षाच्या कालावधीसाठी माहे जून,२०२२ पर्यंत (टोल आकारणी सवलत करारातील तरतुदी व केंद्र शासनाचे रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांचे दि.०५.०५.२००५ रोजीच्या अधिसुचनेतील, ''राष्ट्रीय महामार्ग शुल्क (दर निर्धारण व संकलन) नियम,१९९७ नुसार)'' महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत नियमानुसार टोल वसुली सुरु होती.

सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर, किणी टोलनाक्यासाठी व तासवडे टोलनाक्यासाठी केंद्र शासनाचे नवीन अधिसुचनेनुसार (राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम,२००८) टोल वसुली सुरु करण्यात आली.

तदनंतर कागल ते सातारा सहापदरीकरणाचे कामाअंतर्गत किणी टोल नाका येथे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत व तासवडे टोल नाका येथे सवलतदारामार्फत अनुक्रमे केंद्र शासनाचे अधिसुचनेनुसार टोल आकारणी नियमानुसार सुरु आहे.

(२) अंशत: खरे आहे.

या प्रकल्पावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रु.३२४५.६८ कोटी (बांधकाम, देखभाल दुरुस्ती, व्याज इ.मिळून) इतका खर्च झालेला आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडून बांधकाम कालावधी दरम्यान रु.२३३.१० कोटी एवढया रकमेचे अनुदान देण्यात आले होते. दि.२४ जून,२०२२ अखेरपर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे १९०२.५५ कोटी टोल वसुल करण्यात आलेला आहे.

(३) केंद्र शासनाच्या दि.२३.०६.२०२२ व दि.२९.११.२०२२ च्या अधिसुचनेनुसार व राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम २००८ नुसार अनुक्रमे किणी व तासवडे टोल नाक्यावर सदर प्रकल्पाच्या सहापदरीकरणाचे बांधकाम सुरु असताना मूळ दराच्या ७५ टक्के दराने रोख वसुली सुरु आहे.

(४) होय.

(५) माहे जून,२०२३ मध्ये भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणा समवेत सांगली ट्रान्सपोर्ट असोसिएशनची बैठक झाली.

सदर बैठकीमध्ये टोल वसुलीबाबतच्या सर्व मुद्यांवर चर्चा होवुन सर्व संबंधित कागदपत्रांची प्रत सदर असोसिएशनला देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या बीएमएसच्या तृतीय वर्षाच्या अनेक विद्यार्थ्यांना शुन्य गुण मिळाल्याबाबत

**(३) * ६४७७८ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाने जाहिर केलेल्या बीएमएस तृतीय वर्ष परिक्षेत कॉर्पोरेट कम्युनिकेशन अँड पालिका रिलेशन या विषयात विद्यार्थ्यांना शून्य गुण दिल्याचे दिनांक २० एप्रिल,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विषयात काही विद्यार्थ्यांना आरआर (रिझल्ट रिझर्व) आणि शून्य गुण असे दोन्ही शेरे देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांना अन्य विषयात चांगले गुण व या एका विषयात शुन्य गुण दिल्याने याबाबत विद्यार्थ्यांनी चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, माहे मे,२०२३ मध्ये जाहीर झालेल्या बी.ए. मानसशास्त्र पाचच्या पेपरचा निकाल सुमारे ६ महिन्यांनी जाहिर केला असून तीन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संपूर्ण तुकडीला शून्य गुण दिले असून अनेकांना १०० पैकी १०० तर काहीना १०० पैकी ९९ गुण दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या बीएमएस अभ्यासक्रमाच्या ५ व्या सत्राच्या परीक्षेला ज्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका, उपस्थितीचा अहवाल तसेच पर्यवक्षक अहवाल मध्ये प्रश्नपत्रिका कोड, बार कोड तसेच आसन क्रमांक चुकीचा लिहिला होता अशा विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिका तपासून निकाल घोषित करताना संगणक प्रणालीवरील उत्तरपत्रिका तपासणी पद्धतीमध्ये गुण मिळणे कठीण होते. या कारणास्तव उर्वरीत विद्यार्थ्यांचा निकाल जाहिर करताना दिरंगाई होऊ नये म्हणून अशा २१६ विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेऊन संगणक प्रणालीद्वारे शुन्य गुण दर्शवून निकाल राखीव ठेवण्यात आला होता. तथापि, या सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका व इतर अहवालांचे परिक्षण करुन सुधारीत निकाल जाहिर करण्यात आले आहेत.
(४) व (५) हे अंशतः खरे आहे.

काही महाविद्यालयांनी तृतीय वर्षे सत्र ५ च्या मानसशास्त्र या विषयाच्या नविन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका वितरीत केल्यामुळे सदर विषय तात्पुरत्या स्वरुपात वगळून इतर विषयांचा निकाल दि.१५ एप्रिल,२०२३ रोजी घोषित करण्यात आला तद्नंतर सदरची बाब लक्षात घेऊन परीक्षा मंडळाने मंजूर केलेल्या ठरावानुसार उत्तरपत्रिका ऑफलाईन तपासून सदर विद्यार्थ्यांचे निकाल दि.२९.०४.२०२३ रोजी जाहिर केले. परंतु, जाहिर केलेल्या निकालात त्रुटी आढळल्याने या प्रकरणी कुलगुरुंनी त्रिसदस्यीय चौकशी तथा तज्ञ समिती गठीत करुन या समितीच्या मार्गदर्शनाने दि.३०.०५.२०२३ रोजी मानसशास्त्र या विषयाचा सुधारीत निकाल जाहिर करण्यात आला आहे. या विषयाचा निकाल चार महिन्यांनी जाहिर करण्यात आला आहे.

सदर समितीने दिलेल्या अहवालानुसार विद्यापीठामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औद्योगिक विकास महामंडळामार्फत राज्यातील सुक्ष्म व लघु उद्योगांकडून पुरवित नसलेल्या सेवांचा कर वसुल होत असल्याबाबत

**(४) * ६६४५२ श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुक्ष्म, लघु उद्योग आणि लेबर चार्जेसवर काम करणाऱ्या उद्योगांना औद्योगिक विकास महामंडळ न देणाऱ्या सेवांचा सेवा कर, पाणी कर आणि संबंधित ग्रामपंचायतींचा फाळा वसूल करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या व्यतिरिक्त त्यांना १२ ते १८ टक्के जीएसटी भरावा लागत असल्यामुळे अनेक सुक्ष्म व लघुउद्योग आता आपला जीएसटी नंबर रद्द करुन घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या उद्योगांसाठी दिलासा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.
ग्रामपंचयातीने आकारणी केलेल्या मालमत्ता कराची वसुली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्यात येते व ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतीला देवून उर्वरीत ५० टक्के रक्कमेचा वापर औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना सेवा पुरविण्याकरीता करण्यात येतो.
(२) ग्रामपंचायतीच्या मालमत्ता करावर मऔवि महामंडळ अथवा ग्रामपंचायतीव्दारे जीएसटी लावला जात नाही. तसेच छोट्या व्यापाऱ्यांना जीएसटी भरावा लागत असल्यामुळे जीएसटी नंबर रद्द करण्याविषयी निवेदने प्राप्त झाली नाहीत असे राज्य वस्तु व सेवा कर आयुक्त यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग- रोहा- मुरुड (जि.रायगड) या तीन तालुक्यांना जोडणाऱ्या साळाव पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(५) * ६७१९६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग- रोहा- मुरुड या तीन तालुक्यांना जोडणाऱ्या साळाव पुलाला बार्जने धडक दिल्यामुळे पुलाची दुरवस्था झाली असून या पुलावरील एसटी सेवा बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसटी वाहतूक बंद केल्यामुळे मुरुड- जंजिरा, रेवदंडा, नागाव येथील पर्यटनावर परिणाम झाला असून येथील नागरीक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे सद्य: स्थितीत साळाव पुलाचे दुरुस्तीचे काम विशेष बाब म्हणून तातडीने पुर्ण करण्याची मागणी या परिसरातील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग, पालकमंत्री, रायगड जिल्हा तसेच इतर अन्य संबंधीत अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) सदर पुलाचे गर्डर उचलणे, बियरिंग बदलणे, पेडेस्टल कास्टिंग करणे या संरचनात्मक दुरुस्तीचे कामाकरीता दि.२४.०३.२०२३ ते १४.०६.२०२३ या ८२ दिवस कालावधीसाठी एसटी वाहतूक बंद करण्यात आली होती. दि.१५/०६/२०२३ पासून पूलावरुन एसटी सेवा सुरु करण्यात आली आहे.

(३) विभागाकडे निवेदन प्राप्त नाही.

(४) सदर पुलाच्या संरचनात्मक दुरुस्तीकरिता रक्कम रु.१० कोटी चे मंजूर काम प्रगतीत असून माहे ऑगस्ट,२०२४ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा (जि. पालघर) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानात निकृष्ट दर्जाच्या धान्याचे वाटप करण्यात आल्याबाबत

**(६) * ७११२४ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यातील (जि.पालघर) स्वस्त धान्य दुकानातुन लाभार्थ्यांना मोफत देण्यात येणारा तांदूळ व गहू निकृष्ट दर्जाचा व खाण्यास अयोग्य असल्याने घोणसई ग्रामपंचायतीने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा तालुक्यात एकूण १५७ स्वस्त धान्य दुकाने मंजूर असून सध्या फक्त १२७ धान्य दुकानेच कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना उत्तम दर्जाच्या धान्याचा पुरवठा करणे तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) पालघर जिल्ह्यांतर्गत वाडा तालुक्यामध्ये अशी तक्रार प्राप्त नाही. तथापि, लोकसत्ता वृत्तपत्र, दि.२८.०६.२०२३ मध्ये यासंदर्भात बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर बातमीच्या अनुषंगाने पुरवठा निरीक्षक, वाडा यांनी दि. ०६.०७.२०२३ रोजी चौकशी केली. सदर चौकशीमध्ये तांदळाचे विश्लेषण केले असता, काही प्रमाणात कणी आढळून आली व ती शासन परिपत्रक, दि.२१.११.२०२२ मधील विनिर्देशातील परिमाणानुसार स्वीकारण्याबाबत तरतूद आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेला तांदुळ खाण्यास योग्य असून निकृष्ट दर्जाचा असल्याचे चौकशीत निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बनावट रेशनकार्डधारकांवर कारवाई करुन रेशनकार्ड रद्द करण्याबाबत

**(७) * ६९३४९ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या एक देश एक रेशन कार्ड योजनेंतर्गत दिलेल्या रेशनकार्डांची छाननी केली असता एकूण २,३२,७६६ बनावट रेशनकार्ड असल्याचे आढळून आले असून त्यातील नागपूरमध्ये २४८२१, मुंबई शहर जिल्हयात ६,००० व परभणी जिल्ह्यात ३८ बनावट रेशनकार्ड असल्याचे केंद्र शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट रेशन कार्ड रद्द करण्याची सुचना दिनांक २९ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारास नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरो ३-अ, १३-अ, १६-अ व १७-अ अंतर्गत वितरीत करण्यात आलेली बनावट रेशनकार्ड रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही, केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील माहितीनूसार राज्यात माहे मे, २०२३ अखेर २,३२,७६६ दुबार लाभार्थी होते, सदर लाभार्थ्यांपैकी नागपूर जिल्हयात ३८,१२९ मुंबई शहर जिल्हयात ५,३३८ व परभणी जिल्हयात ९३ दुबार लाभार्थी होते.
(२) हे खरे नाही, राज्यांतर्गत आणि आंतरराज्य दुबार लाभार्थ्यांची पडताळणी पुर्ण करण्याबाबत केंद्र शासनाच्या दि.०१.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त सुचना नुसार गृहभेट पडताळणी करून दुबार लाभार्थी वगळण्याची प्रक्रीया पार पाडण्याबाबत दि.१५.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.
(३) मुंबई शहरातील अ परिमंडळ कार्यालयांतर्गत ३-अ, १३-अ, १६-अ व १७-अ शिधावाटप कार्यालयांतर्गत दुबार लाभार्थ्यांच्या तपासणी अंतर्गत ७२५ शिधापत्रिकेतील लाभार्थी वगळण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मोहगाव (जि.लातूर) येथे भेसळयुक्त तांदूळ वितरीत होत असल्याबाबत

**(८) * ६६९२४ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मोहगाव (जि.लातूर) येथील रेशनदुकानातून फायबर असलेला तांदुळ वितरीत केल्याचे दिनांक ३० मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दुकानदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील खानापूर नाक्याजवळील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(९) * ६७५४९ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्गावरील खानापूर टोलनाका येथील नव्या पुलाच्या दुतर्फा असलेल्या भरावातील स्तर खचून सुमारे १०० मीटर रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच चोरवड ते सावधा (ता.रावेर) आणि चिंचोली ते यावल (ता.यावल) या रस्त्यांची मोठया प्रमाणावर दुरवस्था झाल्यामुळे तेथे वारंवार अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) बऱ्हाणपूर-अंकलेश्वर या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सदर ठिकाणी रस्ता खराब झाला होता परंतु त्याची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

खड्डयांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे व सध्या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) सदर रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी माहे जुलै, २०२३ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले. सध्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे व पावसाळा संपताच डांबरीकरणाद्वारे रस्त्याची दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयात धान खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(१०) * ६५०१० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयामध्ये पणन हंगामातील २२१ भात गिरण्यांकडून भरडाईचे काम सुरू असून पणन व अन्न पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनेक ठिकाणी गैरव्यवहार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किमान आधारभूत खरेदी किंमत योजनेअंतर्गत धानाची निकृष्ट भरडाई करून धान्य मुंबई व ठाणे शिधावाटप केंद्रात नेत असतांना जिल्हाधिकारी, भंडारा यांनी ओम भात गिरणीवर धाड टाकून कारवाई केली असल्याचे दिनांक २१ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अगोदर भंडारा येथे सन २०११-२०१२ मधील धान खरेदीत साडेबारा कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणात जिल्हयातील सहा भात गिरण्यांचाही समावेश असल्याचे सीआयडीच्या तपासात निष्पन्न झाले असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हाधिकारी, भंडारा यांनी ओम राईस मिलवर धाड टाकल्याची बाब खरी नाही.

(३) व (४) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून पोलिस स्टेशन, वरठी येथे अप क्र.१०६/२०१८ अन्वये गुन्हा नोंद असून सदर गुन्ह्याचा तपास गुन्हे अन्वेषण विभागामार्फत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इयता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणेबाबत**

**(११) * ६५६१३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल देशमुख (काटोल), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पात इयत्ता ५ वी ते ७ वी च्या शिष्यवृत्ती रकमेत १ हजार रुपयांवरून ५ हजार रुपये व इयत्ता ८ वी ते १० वी च्या शिष्यवृत्ती रकमेत १५०० रुपयांवरून ७५०० रुपये प्रतीवर्ष प्रती विद्यार्थी इतकी वाढ करण्याचे घोषित केले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयास अद्याप शासनाने मंजूरी दिली नसल्याने त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना या वाढीव शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १३.०६.२०२३ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या मंजुरीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.०३.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च प्राथमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी ) यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करून ती इयत्ता ५ वी करीता रू. ५००/- प्रतिमाह (रू.५००० प्रतिवर्ष) व इयत्ता ८ वी करीता रू.७५०/- प्रतिमाह (रू. ७५००/- प्रतिवर्ष) अशी निश्चित करण्यात आली आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोर-महाड (ता.भोर, जि.पुणे) रस्त्यावरील नीरा नदीवरील पुलाची झालेली दुरवस्था

**(१२) * ६६३३७ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिरडस मावळ (ता.भोर, जि.पुणे) येथील भोर-महाड रस्त्यावरील नीरा नदीवरील आंबेघर येथील पुलाची दुरवस्था झाली असल्याने अपघात होऊन जिवीतहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) तसेच पुणे व सातारा जिल्ह्याच्या हद्दीतील पुणे-पंढरपूर मार्गावरील नीरा नदीच्या पुलाजवळ व पाडेगाव बाजूला अपघातप्रवण क्षेत्र असतानाही येथे गतिरोधक, दिशाफलक, रिप्लेक्टर बसविण्यात आले नसल्याचे माहे मे,२०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुणे-पंढरपूर मार्गावर गतिरोधक, दिशाफलक, रिप्लेक्टर बसविणे तसेच भोर-महाड रस्त्यावरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) पुणे पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील नीरा नदीच्या पुलाजवळ सुरक्षिततेच्या दृष्टिने आवश्यक ती उपाय योजना करण्यात आलेली आहे. या क्षेत्रात रस्त्याच्या दोन्ही बाजुला दिशाफलक, गती रोधक (रम्बलर्स), वेगमर्यादा फलक इ. बसविण्यात आलेले आहेत.

वरंधा घाट आंबेघर भोर प्रजिमा १५ सा.क्र. कि.मी. १२२/२०० येथे निरा नदीवर पुल वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे. पुलाचे संरक्षक कठडे (Railing) दुरुस्त करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.सद्य:स्थितीत पुलाजवळ आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड-नांदगाव रस्त्याचे दुपदरीकरण करण्याबाबत**

**(१३) * ६९६४५ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड-नांदगाव हा मार्ग वळणावळणाचा व काही ठिकाणी अरुंद असल्यामुळे या मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी व अपघाताच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवगड तालुका हा पर्यटनदृष्ट्या विकसीत होत असल्यामुळे या मार्गावरील वाहतूकीत वाढ झाली असल्याने या मार्गाचे दुपदरीकरण करण्याची मागणी अनेक वर्षापासून वारंवार स्थानिक नागरीकांकडून संबंधित विभागाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने देवगड-नांदगाव मार्गाचे दुपदरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर रस्त्याची अस्तित्वातील डांबरी पृष्ठभागाची सर्वसाधारण रुंदी ५.५० मी. इतकी आहे. सणानिमित्त येणारे स्थानिक व पर्यटकांची वाढती वाहतूक वर्दळ, यामुळे विशिष्ट कालावधीत रस्त्यावर वाहतूक कोंडी होते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हायब्रीड ॲन्युटी योजनेअंतर्गत देवगड-नांदगाव या रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी रक्कम रु.८२.५० लक्षचे काम मंजूर करण्यात आले आहे.

सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अभिमत विद्यापीठांच्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी देण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेबाबत**

**(१४) * ७०४८२ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २१ अभिमत विद्यापीठांत सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये आर्थिक व सामाजिकदृष्या मागासवर्गीय संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठांत शिकविल्या जाणाऱ्या वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सर्व ३९ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासनाने रुपये ११८ कोटी ६४ लाख निधीची दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या तुलनेत वैद्यकीय अभ्यासक्रमाचे शुल्क हे प्रतिवर्ष रुपये १० लाख ते २५ लाख इतके असल्याने यासाठी केलेली निधीची तरतूद अत्यंत तुटपूंजी असून यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासंदर्भात तसेच आवश्यक त्या वाढीव निधीची तरतूद करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) खरे आहे.

(२), (३) व (४) मा.मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शासनाची प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत जनहित याचिका क्र.६९/२०११ यामध्ये दि.२०.०३.२०१५ रोजीच्या आदेशान्वये सर्वसंबधित विभागांना आदेशित केलेले आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र.११९/२०२१ नुसार अवमान याचिका दाखल आहे.

सबब, दि.३१.०१.२०२३ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार राज्यातील अभिमत विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या व राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीकरिता पात्र ठरणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ हया शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत दि.२३.०२.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

राज्यातील अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय करण्यासाठी मा.न्या.श्री.एम.एन. गिलानी (निवृत्त) तथा माजी अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालातील सर्वसमावेशक सूत्रानुसार शिष्यवृत्तीची रक्कम अंदाजित करुन सन २०२२-२३ हया शैक्षणिक वर्षापासून राजश्री छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेतंर्गत देण्यात येणारे लाभ हे अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांनाही अनुज्ञेय करण्याकरीता दि.२३.०२.०२३ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरचा निर्णय हा मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाशी संबधित असून न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### कलिना, सांताक्रूझ (मुंबई) येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेने शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांना चार महिने वर्गाबाहेर उभे केल्याबाबत

**(१५) * ६४९८७ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलिना,सांताक्रूझ (मुंबई) येथील एका इंग्रजी माध्यम शाळेच्या फादर व मुख्याध्यापिका यांनी शाळेचे शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांना चार महिने वर्गाबाहेर उभे करून अपमानास्पद वागणूक दिली व त्यांना वार्षिक परिक्षेसही बसू दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी फादर व मुख्याध्यापिका यांच्या विरूध्द वाकोला पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात अशा घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार भविष्यात अशा घटना घडू नये या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अशा काही घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) व (५) या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येत असून चौकशीअंती कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

**विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या बालभारतीच्या पुस्तकाची बांधणी निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(१६) * ६९७०७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या पाठीवरील ओझे कमी करण्यासाठी बालभारतीने यंदा सहा विषयांचे एकच पुस्तक तयार केले मात्र या पुस्तकांचा दर्जा व बांधणी निकृष्ट दर्जाची असून आतील पाने देखील फाटलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच पुस्तकांचे अनेक जिल्हयात विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले असून विद्यार्थ्यांना ते वापरण्यास गैरसोयीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्यातील शासनाच्या सर्व शाळांमधील इ.२ री ते इ.८ वी च्या विद्यार्थ्यांना वह्यांची पाने जोडलेली चार भागातील एकात्मिक पाठ्यपुस्तके पथदर्शी स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचा दि.०८ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जळगाव मेटे, केंद्र आळंद, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद या एकमेव शाळेत इ.७ वीचे बालभारती एकात्मिक भाग - १ (माध्यम - मराठी सेमी-इंग्रजी) या विषयाची पाने सुटत असणारी ३४ पुस्तके प्राप्त झाली होती. सदर पाठ्यपुस्तके तातडीने संबंधितांना बदलून देण्यात आली आहेत.

(३) सदोष पाठयपुस्तके पुरवठा करणाऱ्या मुद्रकास दि.०४ जुलै, २०२३ रोजी बालभारतीमार्फत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.